**प्रतिवादी क्र.२ तर्फे उलटतपास – श्री. व्ही. आर. पाटील वकील.**

**१२.** माझा दि.१५.०८.१९८३ रोजी जन्म झालेला असून दहावी पर्यंतचे शिक्षण झाले आहे. माझे पती बँक ऑफ इंडियासाठी पिग्मी एजंटचे काम करतात. मला एक १९ वर्षाचा मुलगा असून १३ वर्षांची मुलगी आहे. माझे सासर देवर्डे गावापासून ३० कि.मी. अंतरावरती आहे. मी माझ्या स्वतःसाठी पुरावा देत आहे.

**१३**. मी लग्नापासून सासरी राहत आहे. मी या दाव्यात प्रतिवादी क्र.१ ने दिलेल्या लेखी कैफियतीची माहिती घेतलेली आहे. मला या दाव्याच्या नोटीसा मिळण्यापूर्वी वादींनी दावा दाखल केल्याची माहिती नव्हती. मला दावा मिळकतींची माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, सर्व दावा मिळकती ज्ञानोबाच्या वडिलोपार्जित मिळकती आहेत. दावा शेत मिळकतीं मध्ये विद्युत पंप व ३०,०००/– रुपयांची पाण्याची पाईपलाईन आहे. मला ज्ञानोबाच्या नावे ट्रॅक्टर–ट्रॉली असल्याची माहिती नाही.

**१४.** मी वादींनी ज्ञानोबाच्या विरोधात पोटगीसाठी दाखल केलेल्या अर्ज क्र.२/१९७७ चा कागद पाहिला होता. मी या दाव्यात वादी व प्रतिवादींनी दाखल केलेली कागदपत्रे पाहिलेली आहेत. मी ज्ञानोबाने पोटगीच्या अर्जाला आणि या दाव्यात दिलेली लेखी कैफियत वाचली आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामध्ये ज्ञानोबाने गंगूबाईशी त्याचा संबंध नसल्याचे नमूद केलेले आहे. (प्रतिवादी क्र.२ च्या वकिलांनी साक्षीदाराला ज्ञानोबाने फौ.कि.अर्ज क्र.२/१९७७ ला दाखल केलेले लेखी म्हणणे दाखवून त्यास निशाणी क्रमांक देण्याची विनंती केली आहे. प्रतिवादी क्र.४ च्या वकिलांनी सदर लेखी म्हणणे साक्षीदाराने दिलेले नसल्यामुळे त्यास निशाणी देण्यास आक्षेप घेतला आहे. सदर लेखी म्हणणे प्रस्तूत साक्षीदाराचे नसल्यामुळे आक्षेप मान्य करण्यात येतो.)

**१५.** हे म्हणणे खरे नाही की, गंगूबाई सोबत ज्ञानोबाने दि.१२.१२.१९७६ रोजी लग्न केल्याचे खोटे सांगत आहे. प्रतिवादी क्र.१ ने दाखल केलेले नि. क्र.१९ वरील लेखी म्हणणे आम्ही मान्य केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, ज्ञानोबाने त्या लेखी कैफियतीमध्ये त्याचे गंगूबाई सोबत असलेले नातेसंबध नाकारले आहेत. मी प्रतिवादी क्र.१ व ३ चा विवाह झाल्या बाबतचा दाखला दाखल केलेला नाही. मी माझ्या जन्माच्या

नोंदीचा दाखला सादर केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.३ ते ८ यांचा प्रतिवादी क्र.१ सोबत कोणताही संबंध नाही.

**१६**. नि. दि. दा. क्र.१११/२००० च्या दाव्यात या दाव्यातील वादी पक्षकार नव्हते. प्रतिवादी क्र.२ हा वादी क्र.१ चा मुलगा आहे. मी नि. दि. दा. क्र.१११/२००० मध्ये पक्षकार होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या दाव्यामध्ये आम्ही प्रतिवादी क्र.२ वरती दबाव आणून त्याची तडजोड नाम्यावरती स्वाक्षरी घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर दाव्यातील हुकूमनाम्याची जिल्हाधिका-यां मार्फत अद्याप पर्यंत अंमलबजावणी झालेली नाही. मी त्याबाबतची कागदपत्रे मिळाल्यास सादर करु शकते. हे म्हणणे खरे नाही की, फेरफार नोंद क्र.१३९५ ची प्रतिवादी क्र.२ ला नोटीस देण्यात आली नव्हती. मी त्या नोटीसीची प्रत मिळाल्यास सादर करु शकते.

**१७**. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकती प्रतिवादी क्र.१ च्या हयाती पर्यंत एकत्र कुटुंबात होत्या. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ ने त्याच्या लेखी कैफियतीमध्ये वाटण्या झाल्याची बाब नमूद केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकती या बाळकू यांच्या कडून प्रतिवादी क्र.१ ला आलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.१६ ची जमीन बाळकू कूळहक्काने कसत होता. प्रतिवादी क्र.१ ने स्वतः काही मिळकती मिळवलेल्या आहेत. मी त्याबाबतची कागदपत्रे हजर करु शकत नाही.

**१८**. मी सुनिल पांडुरंग भुईंबर याला पाहिलेले आहे. आम्ही प्रकाश तानवडेकर याची साक्ष नोंदविणार आहोत. मला भाऊसाहेब निर्मळे आणि अनिल पांडुरंग परीट कोणत्या गावचे आहेत याबाबत माहिती नाही. मला त्यांची प्रतिवादी क्र.१ सोबत ओळख होती किंवा नाही याबाबत माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमचा ज्ञानोबाशी संबंध नसून दावा मिळकती हडप करण्यासाठी मी आज खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ ने माझ्या हक्कात कोणतेही मृत्यूपत्र करुन दिलेले नाही.

**उलटतपास पुर्ण.**

**<u>प्रतिवादी क्र.९ व १० तर्फे उलटतपास – श्री. एस. एम. देशपांडे वकील.</u>**

**१९**. वकिलांनी उलट तपास नाकारला.

**<u>प्रतिवादी क्र.११ ते १६ तर्फे उलटतपास – श्री. व्ही. बी. कडूकर वकील.</u>**

**२०**. प्रतिवादी क्र.११ ते १६ तर्फे नि. क्र.२४४ वरती दिलेल्या मुदत अर्जावरुन उलट तपास पुढील तारखे पर्यंत तहकूब.

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – २१.०१.२०२५. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.